# ‘एसआरए’मध्ये मोफत शिकवणी वर्ग

## विकसकांचा पुढाकार; इंग्रजी, गणितावर लक्ष केंद्रित

**पुणे, ता. २५ :** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) प्रकल्पामध्ये राहणाऱ्या कुटुंबांतील मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी प्रकल्पांमध्येच मोफत खासगी शिकवणी वर्ग भरणार आहेत. त्याद्वारे विद्यार्थ्यांना इंग्रजी व गणिताची गोडी लागावी, यादृष्टीने त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. त्यासाठी स्वतः ‘एसआरए’ प्रकल्पाच्या काही विकसकांनीच पुढाकार घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासाला विशेष प्राधान्य मिळणार आहे.

### खासगी शिकवणी वर्गाची वैशिष्ट्ये

- इंग्रजी माध्यमातील शिक्षक घेणार वर्ग
- इंग्रजी, गणित व विज्ञान विषयांना प्राधान्य
- विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षणही मिळणार
- अभ्यासाबरोबरच नोकरीच्या संधींवर मार्गदर्शन

झोपडपट्ट्यांसह एसआरए प्रकल्पाच्या इमारतींतील विद्यार्थ्यांकडे शिक्षकांचे होणारे दुर्लक्ष, प्रतिकूल परिस्थिती, मार्गदर्शनाचा अभाव, पालकांची निरक्षरता व शिक्षणाविषयी असलेल्या उदासीनतेमुळे विद्यार्थी शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत नाहीत. याचा विचार करून बांधकाम व्यावसायिक व ‘एसआरए’तील विकसक हेमंत नाईकनवरे यांनी प्रकल्पाच्या इमारतींमध्येच खासगी शिकवणी वर्ग सुरू करण्याचा प्रयत्न केला आहे.

या उपक्रमासाठी रामटेकडी येथील ‘एसआरए’च्या प्रथमा गृहनिर्माण संस्थेच्या तीन इमारतींची पहिल्यांदा निवड केली आहे. त्यातील ५३६ रहिवाशांच्या ३०० मुलांची उपक्रमासाठी निवड केली आहे. नाईकनवरे यांच्या उपस्थितीत रहिवाशांच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत चाकण येथील द्वारका विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती आमरे, उपक्रमाचे व्यवस्थापक प्रमुख शंकर खेतावत, सोसायटीचे अध्यक्ष विनेश पिल्ले, पांडुरंग ओव्हाळ, दिनेश चनाल, श्याम ससाणे, दिगंबर माने उपस्थित होते. त्यामध्ये खासगी शिकवणी वर्ग येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचे ठरविण्यात आले.

खेतावत म्हणाले, ‘‘पालक अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असतात, त्यामुळे मुलांचा अभ्यास घेणे किंवा आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना खासगी शिकवणीसाठी पाठविणे शक्य होत नाही. त्यामुळे या उपक्रमाचा निर्णय घेण्यात आला.’’ रामटेकडीनंतर दांडेकर पूल व अन्य प्रकल्पांवर उपक्रम सुरू होणार आहे.